PAGE No. 1
DATE / /

# तो मी नव्हेच.

बाबा पोलीस कस्टडीमध्ये आहेत, हे ऐकून माझ्या मनाला फारच लागले होते. फार लहान होतो मी, प्राथमिक शाळेतच असेन. आई सारखी रडत होती, पण बाबांच्या जामिनासाठी धावपळ पण करत होती. कसल्या गुन्ह्यासाठी बाबांना पोलीस पकडून घेऊन गेले आहेत हेच मला समजत नव्हते.

आई वकिलांशी बोलत होती,

"वकीलसाहेब, जामिन मिळण्यासाठी काय काय करावे लागेल?"

"ते बघतो मी, मला केस नीट बघावी लागेल."

"बरं, सांगा मला मग काय करायचे ते."

आई जरी नोकरी करत असली तरी तिला पोलीस/कोर्ट ह्या बाबतीत फारशी माहिती नव्हती. तिचे बाबा, माझे आजोबा जरी पोलीसमधल्या मोठ्या हुद्यावरुन निवृत्त झाले होते, तरी ह्या गोष्टी तिला माहित असणे शक्यच नव्हते. आणि माझ्या आईचा जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोण फारच पॉझिटीव होता, एक प्रकारे फारच भोळी होती ती. भले सरकारी खात्यात उत्तम प्रकारे काम करत होती. पण तिला त्या काळात दुनियेचे छक्के पंजे नक्कीच माहीत नसतील, असे मला आता वाटते. म्हणूनच बाबांच्या गोड बोलण्याला भाळून तिने त्यांच्याशी पळून जाऊन लग्न केले होते ते पण एका देवळात. त्याचे कायदेशीर कागदपत्र पण तिच्याकडे नव्हते.

काही दिवसांनी बाबांना जामिन मिळालाही, पण नंतर बाबा आमच्याबरोबर न राहता पुण्यात रहायला गेले. त्यांना तिकडे आणखीनही काही उद्योग करायचे होते ना, पण बिचारी माझी आई, तिला त्यातले काहीच माहित नव्हते. त्या काळात ना मोबाईल, ना फोन, तिला बाबांचा ठावठिकाणा काहीच माहित नव्हता.

आजूबाजूला आमच्याबद्दल चर्चा तर होतच असणार. मला तिने लांबच्या शाळेत घातले होते. शाळेतून येईपर्यंत मला आणि ऑफिसमधून येईपर्यंत आईला इतकी रात्र व्हायची की, आजूबाजूच्या लोकांचा विचार करायलाही वेळ नसायचा आमच्याकडे. मला घराच्या जवळपास कोणीही मित्र नव्हते. शाळेपासून लांब रहात असल्याने शाळेतल्या मित्रांशी पण फार गट्टी नव्हती.

आई आपली नोकरी, माझी शाळा आणि शनिवार, रविवार ह्या आजी आजोबांची विचारपूस कर त्या आजी आजोबांकडे जाऊन ये, हेच करत आयुष्य जगत होती. मामाच्या लग्नात चार

लोकांमध्ये वावरताना आईला किती यातना झाल्या असतील, ते मला आता लक्षात येतयं. प्रत्येक जण आपापल्या जोडीदारा-सोबत सगळ्या गोष्टी एन्जॉय करताना बघून ती मनाला किती जखमी होत असेल, हे जेव्हा मी तिच्या त्या वेळच्या वयात पोचलो, तेव्हा आता मला कळतंय.

आम्ही दोघेच होतो एकमेकांना. आई तिच्या वडिलांकडे मन मोकळे करायची, पण बाकी सगळीकडे नुसतीच [illegible] चर्चा होत असे. मी आईला धीर देण्याइतकाही मोठा नव्हतो. मला मात्र कुठेच मनातले बोलता येत नव्हते, ना कुणी जवळचा मित्र, ना कुणी भाऊ बहिण.

मी कॉलेजच्या पहिल्या वर्षाला असताना, एक दिवशी दारात बाबा येऊन उभे राहिले, आम्ही दोघे आनंदून गेलो. बाबा घरी आले म्हणजे आम्हा दोघांसाठी आनंदोत्सवच होता. बाबांनी मोठ्या जाहिरात कंपनीमध्ये नोकरी मिळाल्याचे सांगितले. "बरं झालं बाई, देवीची कृपाच म्हणायची, आपण सत्यनारायणाची पूजा घालू आणि सगळ्यांना घरी बोलवू, किती आनंद होईल सगळ्यांना" आई आनंदाने म्हणत होती.

बाबांचा काही वेगळाच विचार चालू आहे, हे आमच्या गावीपण नव्हते. आई तिच्या आईबाबांना, बाबांच्या आईबाबांना सांगून आली. 'आता आमचे सगळे मार्गी लागतेय, आम्ही पूजा करू तेव्हा तुम्हा सगळ्यांना घरी बोलवते'

ती घरी पोहोचेपर्यंत बाबा घरात अपकपाचक करून गायब झाले होते. त्यांनी काय नेले, हे आईला समजत नव्हते. पण परत एकदा आपली फसवणूक झाली ह्या विचाराने तिला खूप दुःख झाले.

एक दिवशी अचानक पोलीस येऊन उभे राहिले आणि त्यांनी सर्च वॉरंट दाखवून घराची झडती घ्यायला सुरुवात केली. आई कपाळाला हात लावून बसून राहिली होती.

बाबांनी पुण्यात जाऊन परत उद्योग सुरु केले होते. कार भाड्याने घेऊन बडेजाव कर, त्या कारचे भाडे बुडव, मोठमोठ्या लोकांमध्ये ऊठबस कर, त्यांची पैशांची फसवणूक कर असे उद्योग बाबांनी सुरु केले होते. एका प्रथितयश युनिव्हर्सिटी मध्ये जाऊन लेक्चर्स देणे, आपले नाव बदलून आपण पी.एचडी आहोत, असे लोकांना सांगून, त्यांनी आपल्या बोलण्याने लोकांना भुरळ घातली होती. त्यामुळेच त्यांनी एका सुशिक्षित मुलीशी दुसरे लग्न केले होते, हे सगळे आरोप त्यांच्यावर होते आणि

ते पोलीसांच्या हाती सापडत नव्हते. त्यामुळे रात्री बेरात्री पोलिस आमच्या घरात शिरत आणि घराची झडती घेत. त्यांचाही नाईलाज होता. त्यांना गुन्हेगार हवा होता पण त्यात आम्ही दोघे भरडले जात होतो.

एका व्यक्तीने बाबांना पोलीसांच्या मदतीने पकडून दिले. आता खटला चालू झाला होता. बाबांच्या दुसऱ्या बायकोने आईशी संपर्क साधला आणि दोघी एकत्र येऊन खटला लढायला सज्ज झाल्या.

कोर्टात बाबांनी आईशी केलेले लग्न पूर्णपणे नाकारले, तसे बाबांच्या वकीलाने आईकडे लग्नाचे कायदेशीर कागदपत्र मागितले.

"लग्नाचे सर्टीफिकेट नाही माझ्याकडे, आम्ही पळून जाऊन देवळात लग्न केलं होतं"

"अहो, तुम्ही सुशिक्षित आहात, नोकरी करता, इतकेही माहित नाही तुम्हाला की लग्न रजिस्टर करावे लागते, त्याचे सर्टीफिकेट मिळते. नुसते देवळात लग्न करून चालतं का बाई ?"

वकील मोठ्याने हसत म्हणाला.

"निदान एखादा फोटोतरी ?"

"हो, आहे माझ्याकडे, पुढच्या तारखेला आणते मी."

आईने घरी येऊन फोटोचे अल्बम शोधले, नेमका लग्नाचा फोटो नव्हता. आता आईच्या लक्षात आले, नवऱ्याने येऊन उचकपाचक करून काय नेले ते, ती मटकन खालीच बसली. आता तिच्याकडे लग्नाचा काहीच पुरावा नव्हता.

पुढच्या तारखेला बाबांच्या आई, वडिलांची साक्ष होती. त्यांनी स्वत:च्या मुलाला वाचवण्यासाठी, माझ्या आईला आणि मला ओळखत नसल्याचे सांगितले. खरच, आमचा दोघांचा चांगुलपणावरचा विश्वासच उडाला. जी माझी आई, बाबा इकडे नाहीत, म्हणून त्यांच्या आईवडीलांची काळजी घ्यायची, मी दर शनिवार रविवार आजोबांकडे तबला शिकायला जायचो, त्यांनीच अशी साक्ष द्यावी, काय दुर्दैव होतं आमचं.

माझे बर्थ सर्टीफिकेट दाखवून आणि काही लोकांच्या साक्षी मिळवून आईने लग्न कायदेशीर दाखवण्याचा प्रयत्न केला, ज्या लग्नाचा शेवट फक्त आणि फक्त घटस्फोट हाच होता. आईला फक्त न्याय हवा होता. बाबांना शिक्षा झाली. आता बाबा तरी कशाला म्हणू मी त्या माणसाला, ज्याच्यामुळे माझे बालपण हरवले. आईचे तरुणपण काय पूर्ण आयुष्याचे वाटोळे झाले, पळून जाऊन लग्न करण्याची एक चूक काय झाली माझ्या आईकडून, आयुष्याचा होम झाला तिच्या.

त्यानंतर आईने खंबीरपणे माझे उत्तम शिक्षण केले. तिने स्वत:ची

PAGE No. ४
DATE / /

उत्तम प्रगती करून घेतली.

माझी नोकरी, संसार सगळे चांगले चालू आहे, तरीही माझ्या आयुष्यात हे जे घडले, त्यामुळे माझ्या मनात खूप कडवटपणा आला आहे. आम्हालाच का एवढे दुःख वाट्याला आले, ह्या विचाराने मी आजही खूप व्यथित होतो. माझे आयुष्य दिसायला छान, व्यवस्थित चालू असले तरी ते दिवस आठवले की माझी मनःस्थिती बिघडून जाते.

एका गुन्हेगाराच्या मुलाची मनोव्यथा वाचून आपल्या अंगावर शहारे येतात, पण ते मायलेक त्या काळात कसे जगले असतील, कोणत्या मनःस्थितीमध्ये त्या मुलाने शिक्षण पूर्ण करून आयुष्य मार्गी लावले असेल, हा विचार करून अचंबित व्हायला होते.

आजही मुली पळून जाऊन लग्न करतात, नीट चौकशी न करता मुलींची लग्ने करून दिली जातात. जोडीदार निवडताना पत्रिका वगैरेचे अवडंबर न करता व्यवस्थित चौकशी करून जोडीदार निवडला पाहिजे. मुलांचे आईबाप भलत्याच गोष्टींचे हट्ट धरून बसतात, त्यापेक्षा आपल्या पाल्याच्या आयुष्यात येणाऱ्या व्यक्तीची नीट चौकशी करावी हे उत्तम.

वरील गोष्ट सत्यकथा आहे, त्यात किती जण भरडून गेले त्याला गणती नाही आणि आजही तो माणूस आणखीन एक लग्न करून सुखात आहे.



अंजली चौबळ.
सृष्टी सोसायटी,
कोथरूड, पुणे.

